MHAH030080482024

| | |
|---|---|
| केस दाखल दिनांक | ११/०७/२०२४ |
| केस नोंदणी दिनांक | १६/०७/२०२४ |
| केस निकाल दिनांक | १०/०४/२०२६ |
| कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०१ ०८ २५ |

## अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.०४), अहमदनगर यांचे न्यायालयात

(पीठासीन न्यायाधीश  माधुरी रा. खनवे)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६५१४/२०२४** **निशाणी क्र.३०**

**महाराष्ट्र सरकार**
नगर तालुका पोलीस ठाणे,
अहमदनगर

सरकारी अभियोक्ता **श्री. एस.पी.तडके/श्रीमती. आर.एच.शेळके**

वि.

**कुमार दादाभाऊ फलके,**
वय – ३५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
रा. निमगाव वाघा, ता. जि.अहमदनगर.

आरोपीचे विधीज्ञ **श्री. आर.पी.गोरे**

## न्यायनिर्णय

**(घोषीत दिनांक : १० एप्रिल २०२६)**

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई)(फ) अन्वयेच्या गुन्हयाकरिता चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.पी.तडके/श्रीमती. आर.एच.शेळके  व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर.पी.गोरे यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचा पुरावा आणि दोन्ही वकीलांचा युक्तीवाद लक्षात घेता माझेसमोर न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे उपस्थित झाले, त्या मुद्दयांवरिल निष्कर्ष आणि समर्थनीय कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे शाबीत केले आहे काय की, दिनांक १९/०५/२०२४ रोजी आरोपीच्या घरामागे, निमगाव वाघा, ता.जि.अहमदनगर येथे आरोपीने विनापरवाना ३०० लिटर कच्चे रसायन किंमत रूपये१५,०००/– व ३५ लिटर गावठी हातभट्टी तयार दारू किंमत रूपये३,५००/– अशी एकुण किंमत रूपये १८,५००/– ची बेकायदेशीरपणे विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगले ? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

३. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबीत करण्यासाठी नि.क्र.११ वर पंच राजेंद्र भागुजी पालवे (सा.क्र.१), नि.क्र.१४ वर फिर्यादी जालिंदर मुरलीधर माने (सा.क्र.२) व नि.क्र.२० वर तपासी अधिकारी भिमाबाई भाऊ रेपाळे (सा.क्र.३)यांना तपासले आहे. त्याशिवाय सरकार पक्षातर्फे पंचनामा नि.१२, फिर्याद नि.१५, प्रथम खबरी अहवाल नि.क्र.१६, आदेश नि.२१, दैनिक अहवाल नि.२२, मुद्देमाल पावती नि.२३, रासायनिक तपासणीकामी नमुना घेवुन जाणेसाठीचे पत्र नि.क्र.२४, रासायनिक तपासणीकामीचे पत्राची पोहोच नि.२५, ४१अ ची नोटीस नि.२६, समजपत्र नि.क्र.२७ वर भिस्त ठेवण्यात आली.

**मुद्दा क्र.१ व २ करिता** :–

४. अभियोग पक्षातर्फे सा.क्र.१ ते ३ यांच्या साक्ष पुराव्यावरुन असे दिसुन येते की, त्यांनी फिर्यादी, पंच व तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदविली. दुसरा पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही.

५. प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमालाचा रासायनिक तपासणी अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे रासायनिक तपासणी अहवालाशिवाय आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेले द्रव्य हे वर नमुद रसायन व दारु होती हे सिध्द होत नाही. तसेच सदर नमुना रासयानिक तपासणीकामी नेणाऱ्या वाहकाचा जबाब नोंदविलेला नाही.

६. प्रकरणात उपलब्ध सा.क्र.१ ते ३ यांनी सरकार पक्षाला सहकार्य केले असले

तरी दुसरा पंच व इतर साक्षीदारांचा जबाब नोंदविलेले नाहीत. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत संशयाचा फायदा आरोपीस देणे न्यायोचित होईल. करिता मुद्दा क्र.१ वरिल निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२वरिल निष्कर्षासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे. :–

**आदेश**

१. आरोपी **कुमार दादाभाऊ फलके,** वय – ३५ वर्षे, रा. निमगाव वाघा, ता. जि.अहमदनगर यास मुंबई दारु बंदी कायदा कलम ६५ (ई)(फ) या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५५(१)/ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल – राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर यांचेकडे नियमानुसार विल्हेवाट लावण्याकरिता पाठविण्यात यावे.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७(अ)/ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१(१) नुसार पुढील सहा महिन्यायाठी रु.१५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका द्यावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत व घोषीत करण्यात आला.

MADHURI RAMNARAYANSINHA KHANWE
Digitally signed by MADHURI RAMNARAYANSINHA KHANWE
Date: 2026.04.10 17:04:44 +0530

दिनांक : १०/०४/२०२६ (माधुरी रा. खनवे)
ठिकाण : अहमदनगर. अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.४), अहमदनगर.